| | |
|---|---|
| MHRG110005792024 | दाखल तारीख – ३०.०७.२०२४ |
| | नोंदणी तारीख – ३०.०७.२०२४ |
| | निकाल तारीख – ११.०३.२०२६ |
| | कालावधी – ०१ वर्षे, ०७ महिने, १२ दिवस |

**भाग अ**

**फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (I)**

| | |
|---|---|
| **माणगांव येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**<br>**ता. माणगांव, जिल्हा– रायगड.**<br>[पिठासिन अधिकारी – श्रीमती अ.प्र.मानव(अ.ब.सोनटक्के)] | |
| **संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३१२/२०२४** | |
| **निशाणी – २० न्यायनिर्णय** | |
| **खटला क्रमांक** | संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३१२/२०२४ |
| **गुन्हा रजिस्टर क्रमांक व पोलीस ठाणे** | गु.र.नं.९५/२०२४<br>गोरेगांव पोलीस ठाणे. |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे<br>गोरेगांव पोलीस ठाणे |
| **विरुध्द** | |
| **आरोपी** | **सुखदेव सिताराम शिंदे,**<br>वय वर्षे ४५, धंदा – चालक,<br>रा.चिंचवलीवाडी, ता. माणगांव, जि.रायगड. |
| **प्रतिनिधीत्व** | |
| **अभियोग पक्ष** | सहा.सरकारी वकील श्री. पी. जे. गावंड |

| | |
|---|---|
| **आरोपीतर्फे वकील** | श्री. एस. एस. शिंदे |

**भाग ब**

**फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (II)**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०७.०७.२०२४ |
| फिर्याद पोलीस ठाणेत नोंद झाल्याची तारीख | ०७.०७.२०२४ |
| न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | ३०.०७.२०२४ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | २५.०३.२०२५ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | १७.०७.२०२५ |
| निकालाची तारीख | ११.०३.२०२६ |
| जर शिक्षा दिली असेल तर आदेशाची तारीख | --- |

| | |
|---|---|
| आरोपीचे नाव | मानाराम देवाराम चौधरी |
| अटकेची तारीख | -- |
| जामीनावर खुला केलेची तारीख | -- |
| दोषारोप ठेवलेले गुन्हे | भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५(अ)(ब) प्रमाणे व मोटारवाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ अन्वये |
| निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | निर्दोष मुक्त केले. |
| दिलेली शिक्षा | अंतिम आदेशाप्रमाणे |
| भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ४६८ संपरीक्षेदरम्यान निरुध्द केलेला कालावधी | ------- |

## भाग क

## फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (III)

### अ) अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | राकेश लक्ष्मण दर्गे | पंच | ०९ |
| २. | नंदु रमेश पारावे | पंच | १० |
| ३. | गोविंद दत्ताराम जांभळे | फिर्यादी | १२ |
| ४. | प्रथम प्रभाकर पारावे | साक्षीदार | १६ |

### ब) बचावपक्षातर्फे साक्षीदारांची यादी – निरंक

### क) अभियोपक्षातर्फे शाबीत करणेत आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | कागदपत्र | निशाणी |
|---|---|---|
| १. | घटनास्थळ पंचनामा | ११ |
| २. | तक्रार | १३ |
| ३. | प्रथम खबरी अहवाल | १४ |

### ड) बचावपक्षातर्फे शाबीत करणेत आलेल्या कागदपत्रांची यादी – निरंक

### इ) आरोपीने कबुल केलेल्या कागदपत्रांची यादी – निरंक

### ई) मुद्देमाल यादी – निरंक

## न्यायनिर्णय

## (आज दिनांक ११.०३.२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीच्या विरोधात भारतीय दंड संहिता कलम २८१, १२५(अ)(ब) प्रमाणे व मोटारवाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ अन्वये दोषारोप ठेवण्यात येवून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

### सरकार पक्षाचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेः–

०२. प्रस्तुत प्रकरणात गोविंद दत्ताराम जांभळे हे फिर्यादी आहेत. दि.०७.०७.२०२४ रोजी फिर्यादी घरी असताना त्यांना गावातील प्रथम पारावे यांनी फोनद्वारे कळविले की, फिर्यादीची आत्या विमल तळवटकर हिचा रिक्षाची धडक लागुन चिंचवली फाटा येथे अपघात झाला आहे. सदर अपघातामध्ये फिर्यादीच्या आत्याला डोक्याला व हाताला मार लागला आहे असे समजले. फिर्यादी प्राथमिक आरोग्य केंद्र गोरेगांव येथे गेले असता तेथे फिर्यादीची आत्या विमल हिच्या डोक्याला दुखापत झाली असल्याने तेथे सीटी स्कॅन व एक्सरे या सोयी नसल्याने डॉक्टरांनी उपजिल्हा रुग्णालय माणगांव येथे नेण्यात सांगितले. त्यानंतर फिर्यादी यांनी अपघाताची चौकशी केली असता त्यांना समजले की, त्यांची आत्या लोणेरे बाजुकडून गोरेगांव बाजुकडे रोडने पायी चालत होती. सकाळी १०.३० वा.सु. गोरेगांवकडून लोणेरे बाजुकडे जाणारी रिक्षा क्र. एम. एच. ०६ झेड. ३९३३ याने आरोपी सुखदेव शिंदे याने फिर्यादीची आत्या हिस समोरुन ठोकर मारुन जखमी केले. सबब आरोपीविरूद्ध कार्यवाही होणेकरीता फिर्यादीने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

०३. फिर्यादीच्या जबाबावरुन गोरेगांव पोलिस स्टेशन अधिकाऱ्यांनी गुन्हा नोंद क्र.९५/२०२४ नोंद केला. सदर प्रकरणाचा तपास एस. एस. पवार, बक्कल

क्र.९८४, पोलीस हवालदार यांनी केला व तपास पूर्ण होताच वर नमूद कलमांन्वये आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपीने भारतीय न्याय संहितेचे कलम २८१, १२५(अ)(ब) प्रमाणे व मोटारवाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ अन्वये दंडनीय गुन्हा केल्याचा दोषारोप (निशाणी क्र.०८) त्यांच्यावर ठेवला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगून प्रकरण चालविण्याची विनंती केली.

**०५.** प्रकरणात आरोपीविरुध्दचा आरोप सिध्द करण्यासाठी सरकार पक्षाने साक्षीदार म्हणून पंच साक्षीदार व साक्षीदार यांना तपासले. सदर तपासलेल्या साक्षीदारांच्या साक्षीमध्ये आरोपीच्या विरोधात पुरावा मिळून आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३५१ अंतर्गत बयाणे निशाणी क्र.१९ वर नोंदविले.

**०६.** आरोपपत्राच्या अवलोकानावरुन व सरकार पक्षाच्या कथनावरुन मी पुढील मुद्दे विचारार्थ घेतले व त्यावरील निष्कर्षाची कारणमिमांसा मी खालील प्रमाणे केली आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपीने दिनांक ०७.०७.२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास मौजे चिंचवलीवाडी गावच्या हद्दीत फाट्यावर ता.माणगांव, जि.रायगड येथे आरोपी त्याचे ताब्यातील रिक्षा क्र. एम. एच. ०६ झेड. ३९३३ ही हयगयीने, निष्काळजीपणे बेदरकारपणे चालवुन फिर्यादीची आत्या विमल | |

| | | |
|---|---|---|
| | हीला पायी चालत असताना ठोकर मारुन अपघात केला व त्याद्वारे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१ अन्वये गुन्हा केला, ही बाब सरकार पक्ष सिध्द करतो काय ? | **नकारार्थी** |
| २. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमुद वाहन हे रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने, बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालवुन वर नमुद पायी चालत असलेली विमल हिच्या गंभीर दुखापतीस कारणीभुत ठरला व त्याद्वारे आरोपीने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १२५(अ)(ब) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | **नकारार्थी** |
| ३. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने वर नमुद वाहन सार्वजनिक रस्त्यावर वेगाने आणि सर्वसामान्य जनतेला अपाय होईल अशा रितीने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविली व त्याद्वारे आरोपीने मोटारवाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला काय ? | **नकारार्थी** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## निष्कर्षाची कारणमिमांसा

०७. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. शिंदे यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपीस दोषमुक्त करणेत यावे, अशी विनंती आरोपीतर्फे विधीज्ञांनी केली आहे.

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत :-**

पटलावरील उपलब्ध पुरावा एकत्रीत अवलोकनास्तव घेत असताना तथ्याची पुर्नरावृत्ती होवू नये म्हणुन प्रस्तुतचे मुद्दे मी एकत्रीत घेतले.

०८. अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदार राकेश (सा.क्र.१) यांनी सरतपासात नमूद केले आहे की, दिनांक ०८.०८.२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता पोलीसांनी सदर साक्षीदाराला बोलाविले होते व साक्षीदाराची सही घेतली. परंतु साक्षीदाराची सही कशावर घेतली हे साक्षीदाराला माहिती नाही. तसेच साक्षीदाराने पंचनाम्यातील मजकूर नाकारला आहे. अभियोगपक्षातर्फे उलटतपासामधील सूचक प्रश्न विचारण्यात आलेले आहेत. पंच साक्षीदार राकेश (सा.क्र.१) याने सुचक प्रश्न विचारल्यानंतर घटनास्थळ हे चिंचवली गावच्या हद्दीत लोणेरे ते गोरेगांव रोडवर चिकन सेंटरपासुन १० फुट अंतरावर आहे हे मान्य केले. तसेच घटनास्थळावर रिक्षा क्र. एम. एच. ०६ झेड. ३९३३ ही उभी होती, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा तयार केला हे राकेश (सा.क्र.१) याने मान्य केले आहे. परंतु राकेश (सा.क्र.१) याने पोलीसांनी त्याच्या समक्ष पंचनाम्यातील मजकूर लिहिला व त्यावर राकेश (सा.क्र.१) ने वाचून समजून सही केली हे नाकारले आहे. तसेच उलटतपासामध्ये पंचनाम्यातील मजकूर माहित नसल्याचे व पोलीसांनी तो मजकूर आधीच लिहून ठेवल्याचे मान्य केले आहे. यावरुन साक्षीदार जरी घटनास्थळावर पंचनाम्यासाठी हजर असल्याचे दिसत असले तरी त्याच्यासमक्ष पंचनाम्यातील

दिसत्या परिस्थितीप्रमाणे लिहिला याबाबत शंका निर्माण होते. म्हणून पंच साक्षीदार राकेश (सा.क्र.१) यांचा तोंडी पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

**०९.** पंच साक्षीदार नंदु (सा.क्र.२) यांनी पुराव्यात कथन केले की, दिनांक ०७.०७.२०२४ रोजी गोरेगांव ते लोणेरे रस्त्यावर चिंचवली गावच्या हद्दीत पोलीसांनी त्यांना बोलाविले होते. तेथे रिक्षा व महिलेचा अपघात झाला होता. तेथे प्रथम पारावे याने घटना सांगून घटनास्थळ दाखविले होते. घटनास्थळ हे गोरेगांव मंगल कार्यालयाच्या जवळपास चिकन सेंटरच्या समोर आहे. रोडवर काहीही पडले नव्हते. पोलीसांनी तेथे लिहून घेतले व सदर साक्षीदार यांनी निशाणी क्र.११ च्या पंचनाम्यावर सही केली. पंच साक्षीदार नंदु (सा.क्र.२) यांनी उलटतपासात मान्य केले की, ते चिंचवली गावचे सरपंच असल्यामुळे त्यांचे पोलीसांशी चांगले संबंध आहेत. घटना घडली तेव्हा पावसाळ्याचे दिवस होते. रस्त्यावर नेहमी वाहनांची वर्दळ असते. सदर साक्षीदार यांनी अपघात पाहिलेला नाही. मुलाने घटनास्थळ दाखविण्याच्या अगोदर पोलीसांनी पंचनामा तयार केला होता. नंदु (सा.क्र.२) याने त्याला पोलीसांनी पंचनाम्यासाठी दिनांक ०७.०७.२०२४ रोजी बोलविल्याचे नमूद केले आहे. परंतु निशाणी क्र.११ वरील घटनास्थळ पंचनाम्याच्या अवलोकनावरुन असे दिसून येते की, घटनास्थळ पंचनामा हा दिनांक ०८.०८.२०२४ रोजी केला असल्याचे नमूद केले आहे. तसेच सदर साक्षीदाराने घटनास्थळ दाखविण्याच्या अगोदर पोलीसांनी पंचनामा तयार केल्याचे मान्य केल्यामुळे पंचनामा सदर साक्षीदाराच्या समक्ष तयार करण्यात आला याबाबत शंका निर्माण होते. सबब सदर साक्षीदाराचा पुरावा देखील पुर्णतः विश्वासार्ह नाही.

**१०.** फिर्यादी गोविंद (सा.क्र.३) यांनी पुराव्यात कथन केले की, दिनांक ०७.०७.२०२४ रोजी ते घरी असताना प्रथम पारावे याने फोनद्वार कळविले होते

की, फिर्यादीची आत्या विमल हिचा अपघात झाला आहे. फिर्यादी प्राथमिक आरोग्य केंद्र गोरेगांव येथे गेले असता त्यांच्या आत्याला डोक्याला व हाताला मार लागलेला होता. आत्याने सांगितले की, लोणेरेकडून गोरेगांवकडे पायी चालत जात होती तेव्हा रिक्षावाल्याने धडक दिली. आत्याला पुढील उपचारासाठी माणगांव येथील सरकारी दवाखान्यामध्ये नेले. सदर फिर्यादी यांना प्रथम पारावे यांनी सांगितले की, रिक्षा आरोपी हा चालवित होता व त्यांनीच आत्याला दवाखान्यात नेले. फिर्यादी गोविंद (सा.क्र.३) यांनी उलटतपासात मान्य केले की, अपघात पाहिला नसल्यामुळे अपघात कसा व कोणामुळे झाला हे त्यांना सांगता येत नाही. तसेच सदर साक्षीदाराला अपघातातील रिक्षाचा क्रमांक सांगता आलेला नाही. फिर्यादी गोविंद (सा.क्र.३) च्या पुराव्यावरुन स्पष्ट होते की, तो घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही व त्याचा पुरावा ऐकीव माहितीवर आधारलेला असल्यामुळे घटना संशयापलीकडे सिध्द करण्यास उपयुक्त नाही.

**११.** अभियोगपक्षाच्या कथनानुसार साक्षीदार प्रथम (सा.क्र.४) याने अपघात पाहिला असून जखमी विमल हिला दवाखान्यात नेले आहे. असे असताना देखील प्रथम (सा.क्र.४) याने त्याच्यासमक्ष कोणताही अपघात घडला नसून त्याबाबत त्याला काहीही माहित नाही असे कथन केले आहे. अभियोगपक्षातर्फे प्रथम (सा.क्र.४) याला सुचक प्रश्न विचारण्यात आले आहेत. परंतु त्यावेळी देखील सदर साक्षीदारा अभियोगपक्षाचे कथन नाकारले आहे. तसेच आरोपीला ओळखत नसल्याचे सांगितले.

**१२.** अभियोग पक्षाचा एकंदरीत पुरावा पाहता प्रत्यक्षीदर्शी साक्षीदार यांचा पुरावा आरोप सिध्द करण्याकरिता पुरेसा व उपयुक्त नाही. अभियोगपक्षाने नोंदविलेला साक्षीदारांचा पुरावा हा ऐकीव माहितीवर आधारलेला असून वर नमूद

केल्याप्रमाणे विश्वासार्ह नाही. आरोपीने त्याच्या ताब्यातील गाडी चालवित असताना कशाप्रकारे निष्काळजीपणा केला अथवा काय हयगय केली हे स्पष्टपणे कोणत्याही साक्षीदाराने कथन केले नाही. रस्त्याची परीस्थिती लक्षात घेता केवळ आरोपीच्या गाडीमुळे अपघात झाला ही बाब आरोपीस दोषी धरण्याकरीता पुरेशी नाही. अभिलेखावर जखमी विमल यांना दुखापत झाल्याबाबत कोणतेही वैद्यकिय प्रमाणपत्र सिध्द केले नाही. तसेच त्यांचा पुरावा देखील अभिलेखावर नोंदविला नाही. अभिलेखावरील संपूर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपघाताच्या वेळी आरोपी हा त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणे व रस्त्याच्या परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवून पायी चालत जाणा–या जखमी महिला विमल यांना दुखापत करण्यास कारणीभूत झाला ही बाब संशयापलीकडे सिध्द झालेली नाही. त्यामुळे आरोपी विरुध्दचा गुन्हा शाबीत करण्याकरीता अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. म्हणून आरोपी निर्दोष मुक्त करणे न्यायचित आहे. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबत</u> :–**

**१३.** मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात आल्याने आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. उपरोक्त विवेचनानुसार मुद्दा क्र.५ च्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी सुखदेव सिताराम शिंदे यास भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८१,

१२५(अ)(ब) प्रमाणे व मोटारवाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ अन्वये दंडनीय गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा पूर्वीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करणेत येत आहे.

३. आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ४८१ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५०००/– चा जातमुचलका व जामीन कदबा देऊन पूर्तता करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)**

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.03.12 13:45:37 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः–११.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A.V. Chavan, Stenographer |
| Name of the Court | :- | Smt. A. P. Manav<br>Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.<br>Mangaon. Tal:-Mangaon. |
| Date of decision | :- | 11.03.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 11.03.2026 |
| Order uploaded on | :- | 12.03.2026 |